International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor –7.328
Vol.9 Issue.4 Mar-Apr- 2022

# भारतीय समाजातील महिला विषयक कायदे

**डॉ.साईनाथ राधेशाम बनसोडे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख *महिला कला महाविद्यालय,औरंगाबाद*

**सारांश**

भारतीय समाजात महिलांना आपले जीवन स्वतंत्रपणे आणि सन्मानाने जगता यावे यासाठी महिला विषयक अनेक कायद्याची तरतूद करून स्त्रियांना सबळ करण्यात आले आहे.आज महिलांना त्यांच्या घरी असो किंवा बाहेर असो महिलांना सुरक्षा प्रदान करण्यात आली आहे.यामुळे महिला आत्मनिर्भय बनल्या आहेत.समाजात कायदा आणि सुव्यवस्था टिकून आहे.

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून महिलांना व्यक्तिगत स्वतंत्र नाकारण्यात आल होत.पारंपारिक प्रथेने महिलांना चार भिंतीच तीच विश्व आहे असे मानले जात होते.परंतु कालांतराने परिवर्तन होत गेले आणि भारतीय समाजव्यवस्थेत बदल घडून आला.२१व्या शतकात महिलांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून येऊन महिलांना व्यक्तिगत स्वतंत्र बहाल करण्यात यश आले.महिलांच्या सुरक्षा आणि हक्कासाठी महिला कायदे बनवण्यात आले.या कायद्यामुळे महिलांना सुरक्षा तर भेटलीच परंतु त्याच बरोबर स्वत:चा निर्णय घेण्याचाही अधिकार प्राप्त झाला आहे.आज महिला समाजात पुरुषांच्या बरोबरीने काम करतांना दिसून येते.आज प्रत्येक क्षेत्रात महिला आपले कर्तबगारी सिद्ध करून दाखवतांना आढळून येते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

भारतीय समाजातील महिला विषयक कायद्याचे स्वरूप अभ्यासणे आहे.

**संशोधन पद्धती:**

भारतातील उच्च शिक्षण : समस्या आणि आव्हाने या विषयाचे अध्ययन करण्यासाठी समाजशास्त्रीय अध्ययन पद्धतीचा प्रयोग करण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन लेखनामध्ये दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला असून यामध्ये प्रकाशित लिखान, मासिके, संदर्भ ग्रंथ, इंटरनेट, विविध अहवाल,वृत्तपत्र, इत्यादी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

**महिला संरक्षण कायदा:**

कौटुंबिक छळ (महिला संरक्षण) प्रतिबंधक कायदा स्त्रीला कौटुंबिक,सामाजिक,आर्थिक,व शारीरिक संरक्षण देतो.हा कायदा फक्त पुरुशानाविरुद्धच लागू होतो.यात अंतरिम आदेश देणे,नुकसान भरपाई

देणे,संरक्षण नियुक्ती करणे,भागीदाराच्या घरात राहणाऱ्या अधिकारी,कायदेशीर व वैद्यकीय मदत देण्याची तरतूदहि आहे.

**अश्लीलताविरोधी कायदा:**

भारतीय दंड संहितेच्या कलम २९२ ते २९४ मध्ये महिलांशी अश्लील वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची तरतूद आहे.त्याचप्रमाणे जाहिराती,पुस्तक,चित्र आदी माध्यमातून महिलांची विटंबना करणाऱ्या चितार किंवा लेखनातून अश्लीलता सादर करणाऱ्या विरोधी कायदा १९८७ नुसार वारंटशिवाय अटक करण्याचा अधिकारही आहे.

**हुंडा प्रतिबंधक कायदा:**

१९६१ च्या या कायद्यान्वये हुंडा मागणे आणि हुंडा देणे हे दोन्ही गुन्हे आहेत.हा कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड संहितेमध्ये ३०४ (ख) आणि ४९८ (क) हि नवीन कलमे अंतर्भूत आहेत.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा:**

बालविवाहाची प्रथा बंद करण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक अधिनियम (शारदा अक्ट) १९८७ मध्ये सुधारणा झाल्या आहेत.लग्नाच्या वेळी मुलीचे वय १८ वर्ष आणि मुलाचे वय २१ वर्षाहून कमी असल्यास शिक्षेची तरतूद आहे.हा कायदा सर्व जातीधर्माच्या लोकांना सारखाच आहे.

**छेडछाड करणे गुन्हा:**

स्त्रीची अब्रू लुटणे,हात धरणे, तिच्या वस्त्रांना हात लावणे अशा प्रकारे विनयभंग करणाऱ्यांना भारतीय दंड संहिता ३५४ खाली शिक्षेची तरतूद आहे.तसेच छेडछाड केल्याबद्दल भारतीय दंड संहिता कलम ५०९ अंतर्गत पोलिसात तक्रार दाखल करता येते.

**मुलावर हक्क:**

एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वत:जवळ ठेऊ शकते.मात्र पाच वर्षाहून अधिक वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णयच बांधील असतो.

**कौटुंबिक न्यायालय कायदा:**

दाम्पत्य आणि कौटुंबिक कलहाची प्रकरणे एकाच ठिकाणी सोडवण्यासाठी कौटुंबिक अधिनियम १९८४ लागू करण्यात आला आहे.कुटुंब न्यायालय नसल्यास तिथल्या जिल्हा कोर्टाना कुटुंब न्यायालयाचा दर्जा देण्यात आला आहे.

**हिंदू उत्तराधिकार:**

१९५६ मध्ये निर्माण झालेल्या हिंदू उत्तराधिकारी कायद्यानुसार महिलांना संपत्तीमध्ये व्यापक अधिकार देण्यात आले असून स्त्रीधनाचा उपभोग घेण्याचा आणि ते धन खर्च करण्याचा अनिर्बंध अधिकार

स्त्रीला मिळाला आहे.हिंदू स्त्रीला एकत्र कुटुंबाच्या संपत्तीत सुद्धा वाटणी मागता येते.स्त्री धन मिळावे म्हणून स्त्री कोर्टात खटला दाखल करू शकते.स्त्रीला मुलाप्रमाणेच वडिलोपार्जित संपत्तीमधेही समान हक्क दिला गेला आहे.

**समान वेतन कायदा:**

समान वेतन कायद्यानुसार एकाच कामासाठी स्त्री व पुरुष दोघांना समान वेतन मिळाले पाहिजे.विशिष्ट कार्यक्षेत्रातील नौकऱ्या सोडता अन्य ठिकाणी स्त्रियांना रात्र पाळीला कामाला बोलावता येत नाही.

**हिंदू विवाह कायदा :**

भारतीय दंड संहिता नियम १२५ अनुसार स्त्रीला पोटगी मागण्याचा अधिकार आहे.हिंदू विवाह कायदा १९५५ कलम २५ नुसार अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट पोटगीची रक्कम देण्याचे आदेश देते.पती-पत्नीच्या वादामध्ये निकाल लागेपर्यंतच्या मधल्या काळात सुद्धा पत्नीच्या उदरनिर्वाहासाठी अंतरिम पोटगी रक्कम देण्याची तरतूद कायद्यात आहे.

**प्रसूती सुविधा कायदा:**

नौकरी पेशातील महिलांसाठी बाळंतपानाची आणि नवजात बाळाची देखभाल करण्यासाठी रजेची तरतूद असून त्या काळात स्त्रीला विशिष्ट दिवसाची भर पगारी रजा मिळते.मात्र कायद्यानुसार ती रजा व इतर फायदे फक्त दोन बाळंतपनासाठी असतात.गर्भपात झाल्यावरही स्त्रीला भरपगारी रजा मिळण्याची तरतूद कायद्यात आहे.

**विशेष विवाह अधिनियम:**

विशेष विवाह अधिनियम १९५४ च्या तरतुदीनुसार मानसिक दृष्ट्या सक्षम आणि १८ पूर्ण झालेली स्त्री प्रेमविवाह किंवा आंतरजातीय विवाह स्वत:च्या इच्छेनुसार करू शकते.या विवाहाची नोंदणी करणे आवश्यक असून पुरुषांचे वय २१ वर्षा पेक्षा अधिक असावे लागते.

**गर्भलिंग चाचणी:**

स्त्री भ्रण हत्या रोखणे व गर्भाचे लिंग जाणून घेण्याच्या तंत्राचा दुरुपयोग करणे यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रसूतीपूर्व निदान आणि तंत्रज्ञान विनिमय व दुरुपयोग निवारण अधिनियम १९९४ आहे.

**जिल्हा महिला सहाय्यता समिती:**

महिलांचे शोषण आणि छळ होऊ नये म्हणून हायकोर्टाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला सहाय्यता समिती स्थापन झाली आहे.होणारे शोषण

किंवा छळ याबद्दलची तक्रार या समितीकडे महिला लेखी स्वरूपात देऊ शकते.तसेच न्याय मिळण्यासाठी कायदेशीर सल्लागार व स्वयंसेवी संस्थांची व्यवस्था समिती तर्फे केली जाते.

**लैंगिक छळाविरुद्ध मार्गदर्शक तत्व:** नौकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबवण्यासाठी सुप्रीम कोर्टाने मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. खाजगी,सार्वजनिक तसेच अन्य संस्थामध्ये सुद्धा ती लागू आहेत. लैंगिक चाळे आणि तक्रारी थांबवण्याची जबाबदारी संबंधित संस्थावर तसेच कर्मचारीवर आहे.तसेच तक्रारीच्या झटपट निवारणासाठी प्रत्येक विभागात महिला अध्यक्षासह अर्ध्यापेक्षा अधिक महिला असणारी समिती स्थापन करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.आणि तक्रार थांबवण्याची जबाबदारी संबंधित संस्थावर तसेच कर्मचारीवर आहे.

**महिलांच्या अटकेसंबधी:** महिलांना फक्त महिला पोलीस सुर्योदयानंतर आणि सूर्यास्तापूर्वी अटक करू शकतात.कुटुंबाच्या सदस्याच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलीस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते.स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवता येते.

**महिला आयोग:** महिलांना संवैधानिंक व न्यायिक सुरक्षा आणि अधिकार देण्यासाठी ३१ जानेवारी १९९२ रोजी महिला आयोगाची स्थापना झाली.प्रत्येक राज्यातही महिला आयोग स्थापन झाला आहे.महिला कोणतीही तक्रार थेट महिला आयोगाकडे करू शकतात.आयोगाला सिविल कोर्टाप्रमाणे चौकशी आणि तपासणी करण्याचे अधिकार आहेत.हा आयोग वेळोवेळी सरकारला महिला कल्याणाच्या योजनाही सादर करतो.

**सांराश:**

भारतातील महिलांच्या सुरक्षेसाठी आणि अधिकाराची अंमलबजावणी करण्यासाठी वरील सतरा अधिकार भारतीय न्यायव्यवस्थाने दिले असून यामुळे महिलांचे मोठ्या प्रमाणात सबलीकरण झाले आहे.महिला आज प्रत्येक क्षेत्रात आपली महत्वाची कामगिरी बजावत आहे.तसेच महिलांना राजकरणात सुद्धा ३३% आरक्षण मिळाले.

**संदर्भ सूची:**

1. शारंगपाणी सरोजिनी, स्वातंत्र्यत्तर स्त्रीविषयक कायदे
2. योजना मासिक-मार्च २०१८ सूचना व प्रकाशन मंत्रालय भरत सरकार
3. दैनिक लोकमत-मार्च २०१९
4. लोकराज्य मासिक-एप्रिल २०१९
5. इंटरनेट